## शिक्षण विभाग (प्रा.) जिल्हा परिषद, उस्मानाबाद

# उल्लेखनीय बाबी

## सन :- २०१७-१८ पासून अद्यापपर्यंत

# शिक्षण विभाग (प्रा.) जिल्हा परिषद, उस्मानाबाद २०१७-१८

| शाळेचे व्यवस्थापन | एकूण शाळा संख्या | प्राथमिक शाळा (इ. १ ते ४/५) | उच्च प्राथमिक शाळा (इ. १ ते ६/७/८) | माध्यमिक शाळा (इ. ५ ते १० ) | उच्च माध्यमिक शाळा (इ. ५ ते १२) | विद्यार्थी संख्या | एकूण शिक्षक संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जिल्हा परिषद | 1092 | 607 | **432** | 49 | 4 | 107882 | 5324 |
| नगर परिषद | 31 | 15 | 16 | 0 | 0 | 2084 | 118 |
| नवोदय विद्यालय | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 452 | 17 |
| आदिवासी कल्याण विभाग | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 133 | 9 |
| समाज कल्याण विभाग-शासकीय | 03 | 0 | 0 | 3 | 0 | 514 | 9 |
| अनुदानीत सैनिकी शाळा | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 521 | 16 |
| खाजगी अनुदानीत शाळा | 454 | 47 | 87 | 305 | 15 | 15586 | 4881 |
| खाजगी विना अनुदानीत शाळा | 264 | 112 | 48 | 71 | 33 | 31850 | 1227 |
| इतर शाळा | 7 | 4 | 2 | 1 | 0 | 782 | 37 |
| **एकूण** | **1854** | **785** | **585** | **435** | **49** | **299327** | **11630** |

# जिल्हा परिषदेच्या ई-लर्निंग शाळा

- उस्मानाबाद जिल्हा परिषदेच्या १०८७ शाळांपैकी ७२२ शाळा लोकसहभाग, १४ वा वित्त आयोग तसेच CSR यांच्या सहभागातून ई-लर्निंग झालेल्या आहेत.
- ई-लर्निंगचे फायदे- अध्ययन-अध्यापन प्रक्रिया आनंददायी व मनोरंजक होऊन प्रभावी होण्यास मदत होत आहे. वर्गातील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये तंत्रज्ञानाची जोड असल्याने प्रत्येक विद्यार्थी स्पर्धेत टिकण्यास मदत होत आहे.शाळा लोकउठावातून ई-लर्निंग करण्यासाठी समाजाचा सक्रीय सहभाग शाळांमध्ये दिसून येत आहे.
- शासनाच्या विविध ऑनलाईन कामे ई-लर्निंग शाळामुळे वेळेवर होण्यास मदत होत आहे.
- शाळाबाह्य व स्थलांतरीत बालकांचे गळतीचे व स्थगितीचे प्रमाण कमी होएयास मदत होत आहे.
- अशा डिजीटल शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढत असून त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होत आहे.





# जिल्हा परिषदेच्या डिजीटल स्कूल

- नाविण्यपूर्ण उपक्रमांतर्गत जिल्हा नियोजन व विकास समिती यांचेकडून १५६ जि.प. शाळांसाठी रू. ३६१.०० लक्ष उतका निधी प्राप्त.
- वर्गातील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये तंत्रज्ञानाची जोड असल्याने प्रत्येक विद्यार्थी स्पर्धेत टिकण्यास मदत होत आहे.
- यामुळे शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, क्षेत्रीय अधिकारी, आणि जिल्हा परिषदेचे अधिकारी व पदाधिकारी यांच्यामध्ये इंटरॲक्टीव्ह बोर्डद्वारे साधणार सुसंवाद.
- चालू वर्षामध्ये प्रत्येक ग्रामपंचायत मार्फत १४ वा वित्त आयांगाच्या निधीमधून जि.प. च्या शाळेतील सर्व वर्ग डिजीटल करण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.
- अशा डिजीटल शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढत असून त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होत आहे.
- 






# तंत्रस्नेही शिक्षक

- प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम अंतर्गत - प्रगत शाळा करण्यासाठी नाविण्यपूर्ण उपक्रमांतर्गत प्रथम जिल्हा परिषदेच्या सर्व शाळेतील शिक्षक आणि खाजगी शाळेतील शिक्षक या सर्वांना तंत्रस्नेही शिक्षक होण्यासाठी DIECPD, उस्मानाबाद यांच्यावतीने या संदर्भात प्रशिक्षण देण्यात येत आहेत.
- वर्गातील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये तंत्रज्ञानाची जोड असल्याने प्रत्येक विद्यार्थी स्पर्धेत टिकण्यास मदत होत आहे. अद्यापपर्यंत ८५ टक्के शिक्षक तंत्रस्नेही शिक्षक झाले असून त्याचा वापर दैनंदिन अध्यापनामध्ये करत आहेत.
- जिल्ह्यातील सर्व शिक्षकांनी तंत्रस्नेही शिक्षक होण्यासाठी केंद्रस्तरीय शिक्षण परिषदांचे आयोजन प्रत्येक स्तरावर करण्यात आले असून त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत तसेच सातत्याने व्यावसायिक विकास होण्यास





# प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम अंतर्गत - प्रगत शाळा

- सन २०१५-१६ अखेर एकूण १७३८ पैकी ९८६ शाळा प्रगत झालेल्या असून जि.प. च्या १०९३ पैकी ७२४ शाळा प्रगत झाल्याचे मु.अ. यांनी ऑनलाईन भरलेल्या माहितीवरून दिसून आले. प्रगत शाळांचे शेकडा प्रमाण ६६.२३% दिसून येते.
- सन २०१६-१७ अखेर एकूण १७८२ पैकी १२६१ शाळा प्रगत झालेल्या असून जि.प. च्या १०९३ पैकी ७२४ शाळा प्रगत झाल्याचे मु.अ. यांनी ऑनलाईन माहितीवरून दिसून आले. प्रगत शाळांचे शेकडा प्रमाण ७०.१६% दिसून येते. सन २०१८-१९ मध्ये एप्रिल २०१९ अखेर प्रत्येक शाळा प्रगत करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.





# 33 कोटी वृक्षलागवड कार्यक्रम - दि.१ जुलै २०१८ ते ७ जुलै २०१८

- या कालावधीमध्ये जि. प. पदाधिकारी व अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात १,६३,८७० उद्दिष्टांपैकी १,८०,७९६ रोपांचे शालेय परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. त्यापैकी १,५४,४९५ झाडे माहे ऑक्टोबर २०१८ अखेर जिवंत होते.
- शासनाने दिलेल्या उद्दिष्टांपेक्षा अधिक रोपे लावून जिल्हा परिषद शिक्षण विभागाने विक्रमी वृक्षारोपण केले.उक्त वृक्षारोपणापैकी आजपर्यंत ८५% वृक्षांचे संवर्धन करण्यात आले आहे.
- माझी शाळा -माघी टेकडी हा उपक्रमांतर्गत १३१ टेकड्यांवर १९००० झाडे लावलेली आहेत.





# शाळाबाह्य व स्थलांतरीत बालकांसाठी - बालरक्षक

- ६ ते १४ वयोगटातील शाळाबाह्य व स्थलांतरीत बालकांची गळती व स्थगिती रोखण्यासाठी बालरक्षक म्हणून प्रत्येक शाळेतील एक उपक्रमशील शिक्षक यांची ऑनलाईन नोंदणी आजपर्यंत ७०० शिक्षकांनी केली आहे.
- या उपक्रमासाठी जिल्हा परिषदेचे अधिकारी व पदाधिकारी यांच्या नेतृत्त्वाखाली ६ ते १४ वयोगटातील एकही बालक शाळाबाह्य राणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात येत आहे. बालरक्षकांनी या कामी चांगले सहकार्य केले आहे.





# जिल्हा परिषद शाळांचे पालटले रूप

- प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम अंतर्गत जिल्हा परिषद पदाधिकारी व अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली लोकसहभागातून जिल्हा परिषद शाळांचे बदलले रूप
- जिल्ह्यातील सर्व शाळांनी रंगरंगोटी, बोलक्या भिंती तसेच ज्ञानरचनावादी साहित्य निर्मिती करून शालेय परिसर स्वच्छ व नीटनेटका तसेच आकर्षक करण्यात आला आहे.
- **गावाला शाळेचा अभिमान व शाळेला गावाचा आधार** या उपक्रमातून दिसून येत आहे.






# शालेय परसबाग

- शालेय पोषण आहार योजने अंतर्गत जिल्हा परिषद शाळांच्या परिसरामध्ये  शालेय परसबागेची निर्मिती करण्यात आलेली आहे.
- जिल्हा परिषद शाळांच्या परिसरामध्ये  शालेय परसबागेतील भाजीपाला व फळभाज्यांचा दैनंदिन पोषण आहारामध्ये सकस आहार विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे.
- याद्वारे  शालेय विद्यार्थ्यांचे आरोग्य  सुदृढ होण्यास मदत होत आहे.






# शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांचे प्रशिक्षण व बैठकांमधून लोकसहभाग

- RTE Act २००९ मधील कलम २१ नुसार जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समित्या कार्यरत आहेत.
- या शाळा व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने प्रत्येक वर्षाचा शाळा विकास आराखडा पूर्ण करून वरीष्ठ कार्यालयास सादर केला जात आहे.
- याद्वारे गावस्तरावर शालेय कामकाजाचे सनियंत्रण होण्यास मदत होत आहे.






# राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना -

## ( इ. १ ली ते १२ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी )

- शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय दि. १ ऑक्टोबर २०१३ मध्ये नमुद केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार या योजनेची अंमलबजावणी चालू आहे.
- सन २०१६-१७ या वर्षातील ३२ लाभार्थी विद्यार्थ्यांना चालू वर्षामध्ये प्राप्त तरतुद रू. २४ लक्ष एवढ्या रक्कमेचे वाटप केले आहे. सन २०१७- १८ या वर्षामधील ४२ लाभार्थींना रू. ३०.७५ लक्ष रक्कमेचे वाटप केले आहे. उर्वरीत लाभार्थींना शासनाकडून रक्कम प्राप्त होताच वाटप करण्यात येणार आहे.
- सन २०१८-१९ मध्ये ४० विद्यार्थी पात्र असून यासाठी शासनस्तरावर निधीची मागणी केली असून सदर निधी प्राप्त होताच संबंधितास वाटप करण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे.
- याद्वारे अपघात झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकास सानुग्रह अनुदान दिल्यामुळे त्यांना आर्थिक मदत होत आहे.





# बालकांना २५% मोफत प्रवेश - ऑनलाईन नोंदणी

## (3 ते ६+ वयोगटातील बालकांना - नर्सरी व इ. १ ली या वर्गामध्ये प्रवेश )

- RTE Act २००९ मधील कलम १२ मधील तरतुदीनुसार शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय दि.१६ जानेवारी २०१८ मध्ये नमुद केलेल्या मधील तरतुदीनुसार या योजनेची अंमलबजावणी चालू आहे.
- सन २०१२-13 या वर्षामध्ये ८९, २०13-१४ मध्ये १९६, २०१४-१५ मध्ये २८६, २०१५-१६ मध्ये ४४८, २०१६-१७ मध्ये ४११, २०१७-१८ मध्ये ७3४ आणि २०१८-१९ मध्ये ५ फेऱ्यांमध्ये १०७६ इतक्या बालकांना ( सामाजिक वंचित घटक, आर्थिक दुर्बल घटकातील तसेच दिव्यांग बालकांना ) मोफत प्रवेश देण्यात आलेले आहेत. यावर्षापासून घटस्फोटीत महिला, विधवा महिला यांची बालके यांचेसाठीही प्रक्रिया चालू आहे.



# अपंग समावेशीत शिक्षण

- सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत अपंग समावेशीत शिक्षण या उपक्रमामधून दिव्यांग विद्यार्थ्यांचा शोध, तालुकासतरावर आरोग्य शिबीरांचे आयोजना नंतर संदर्भ सेवा व विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा तसेच साधने पुरविली जात आहेत. याकरीता प्रत्येक तालुकास्तरावर दिव्यांग विद्यार्थ्यांच्या तपासणी करीता शिबीरांचे आयोजन करण्यात आले असून २०६९ दिव्यांग विद्यार्थ्यापैकी १०४२ दिव्यांग विद्यार्थ्यांना ऑनलाईन अपंगत्व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.
- याद्वारे दिव्यांग विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा तसेच साधने यापूर्वी शिक्षण विभागाने दिलेली असल्यामुळे या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती चांगली होण्यास मदत होत आहे.

## जिल्ह्यातील ९८७ दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप



### जिल्हा परिषद उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील यांची माहिती

उस्मानाबाद दि. २१ (प्रतिनिधी) –

उस्मानाबाद जिल्ह्यातील आठही तालुक्यामध्ये तारखा निश्चित करुन दिव्यांग विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रमाणपत्रे देण्यासाठी शिबीरे घेण्यात आली. यामध्ये ९८७ विद्यार्थ्यांना दिव्यांग प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले असून प्रमाणपत्र वाटपात उस्मानाबाद जिल्हा परिषद राज्यात प्रथम क्रमांकावर आहे. अशी माहिती जिल्हाप परिषदेच्या उपाध्यक्षा तथा शिक्षण सभापती अर्चनाताई पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दिव्यांग विद्यार्थ्यांना अपंगत्व प्रमाणपत्र वाटप शिबीर संदर्भात माहिती देण्यासाठी जि.प.उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील यांच्या दालनात सोमवार दि. २१ रोजी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली. त्यावेळी सदरील माहिती देण्यात आली. यावेळी जि.प. अध्यक्ष नेताजी पाटील, शिक्षण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना अर्चनाताई पाटील म्हणाल्या की, शिक्षण हक्क कायदा २००९ नुसार विशेष गरजा असणाऱ्या बालकामध्ये कोणताही भेदभाव न करता समावेशित शिक्षणाद्वारे २१ दिव्यांग प्रकारातील सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे नमूद करण्यात आले आहे. अशा दिव्यांग विद्यार्थ्यांना यापूर्वी जिल्हा सामान्य रुग्णालयाकडून दिव्यांगत्व प्रमाणपत्र दिले जात असे. तथापी ग्रामीण भागातील दुरवरच्या जिल्हास्तरावर सदर प्रमाणपत्रासाठी समितीसमोर येणे शक्य होत नसल्यामुळे बहुतांशी दिव्यांग विद्यार्थी प्रमाणपत्र व शासनाच्या विविध सेवा सुविधापासून वंचित रहात होते. ही बाब शिक्षण विभाग व जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यवसायिक विकास संस्था यांच्याकडून जि.प. अध्यक्ष उपाध्यक्षा यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. त्यानुसार अध्यक्ष व उपाध्यक्षांनी संबंधित विभाग प्रमुखांची बैठक घेऊन तालुकास्तरीय शिबीरे घेऊन ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्र देण्यासाठी पुढाकार घेतला.

उस्मानाबाद जिल्ह्यातील एकूण ६७७९ दिव्यांग विद्यार्थ्यांचा शोध घेण्यात आला. यापैकी प्रमाणपत्राची गरज असणारे ३०९० विद्यार्थी निदर्शनास आले. भूम तालुक्यात १४१, लोहारा तालुक्यात ७०, उमरगा तालुक्यात २२०, कळंब तालुक्यात १२५, वाशी तालुक्यात ५५, परंडा तालुक्यात ८४, तुळजापूर तालुक्यात २२७, उस्मानाबाद तालुक्यात ६५ अशा एकूण ९८७ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले आहे.

**२५ जानेवारीला शिबीर**

उस्मानाबाद तालुक्यात १५ केंद्र असून ९ केंद्राचे शिबीर तेर ग्रामीण रुग्णालयात घेण्यात आले होते. यामध्ये ६५ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित ६ केंद्राचे शिबीर २५ जानेवारी रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय उस्मानाबाद येथे आयोजित करण्यात आले आहे.

जिल्हा परिषद, जिल्हा शैक्षणिक सातत्यपुर्ण व्यवसायिक विकास संस्था, अरोग्य विभाग, शिक्षण विभाग व जिल्हा सामान्य रुज्नालय उस्मानाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग विद्यार्थीना ऑनलाईन प्रमाणपत्र वितरण शिबीर माहिती

सन २०१८-२०१९

तालुका स्तरीय अपंगत्व प्रमाणपत्र वाटप शिबीर विद्यार्थी संख्या तालुका निहाय व दिनांक आणि ठिकाण

| अ.क्र | तालुका | आपेक्षित विद्यार्थी संख्या | उपस्थित विद्यार्थी संख्या | प्रमाणपत्र वाटप संख्या | दिनांक | स्थळ/ ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भुम | २९७ | ४२६ | १४१ | २४/०८/२०१८ व ३१/०८/२०१८ | उपजिल्हा रुग्णालय भुम | |
| २ | लोहारा | ११३ | १२७ | ७० | ०७/०९/२०१८ | उपजिल्हा रुग्णालय लोहारा | |
| ३ | उमरगा | ३३८ | ३२२ | २२० | २१/०९/२०१८ व २८/०९/२०१८ | उपजिल्हा रुग्णालय उमरगा | |
| ४ | कळंब | १३५ | २०२ | १२५ | ०१/१२/२०१८ | ग्रामीन रुग्नालय कळंब | |
| ५ | वाशी | ६० | १३० | ५५ | ०७/१२/२०१८ | उपजिल्हा रुग्णालय वाशी | |
| ६ | परंडा | २३२ | २४९ | ८४ | १४/१२/२०१८ व २१/१२/२०१८ | उपजिल्हा रुग्णालय परंडा | |
| ७ | तुळजापूर | ३३१ | ३८९ | २२७ | २८/१२/२०१८ व ०४/०१/२०१९ | उपजिल्हा रुग्णालय तुळजापूर | |
| ८ | उस्मानाबाद | २१९ | २२४ | १२० | ११/०१/२०१९ व २५/०१/२०१९ | ग्रामीण रुग्णालय तेर व जिल्हा सामान्य रुग्णालय उस्मानाबाद | |
| | एकुण | १७२५ | २०६९ | १०४२ | | | |


# मुलींचे शिक्षण -

- सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत मुलींचे शिक्षण या उपक्रमामधून मुलींसाठी उदा. माता पालक संघ, मिना-राजू मंच, मुलींची आरोग्य तपासणी यासारख्या उपक्रमांची अंमलबजावणी केली जात आहे.
- सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त मुलींच्या किशोरी मेळाव्याचे आयोजन बीटस्तरावर दरवर्षी केली जाते. तसेच दि. ८ मार्च या दिवशी जागतिक महिला दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन शाळास्तरावर केले जात आहे.
- अशा विविध उपक्रमांच्या आयोजनामुळे मुलींची गळती रोखून शैक्षणिक प्रगती चांगली होण्यास मदत होत आहे.






**जि.प.कन्या प्रा. शा. तडवळे (क.) ता. जि. उस्मानाबाद या शाळेच्या इमारतीची रंगरंगोटी आणि शैक्षणिक गुणवत्तेच्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.**




पुढारी

# आदर्श कन्या शाळेचे बाराही महिने विद्यादान

## विद्यार्थ्यांना सुटी शब्दच माहीत नाही; गुणवत्तेचे माहेरघर म्हणून ओळख

**कसबे तडवळे : विकास उबाळे**

जिल्हा परिषद शाळा हे नाव ऐकल्याबरोबर डोळ्यांसमोर येते ती कुठल्याच सोयी सुविधा नसलेली अन् जेमतेम विद्यार्थी संख्या असलेली शाळा, मात्र इंग्लिश स्कूललाही लाजवेल अशी आदर्श कन्या प्राथमिक शाळा कसबे तडवळे येथे मोठ्या दिमाखात सुरू आहे.

गेल्या ११ वर्षांत या शाळेच्या तब्बल १० मुली नवोदय विद्यालयासाठी प्रवेशपात्र तर २० मुली शिष्यवृत्तीधारक झाल्या आहेत. रविवार, कोणताही सणवार, दिवाळी सुटी अथवा उन्हाळी सुटी, काहीही असो, वर्षाचे १२ महिने चालूच असणारी ही जिल्ह्यातील एकमेव शाळा आहे. शाळेची गुणवत्ता, आकर्षक रंगरंगोटी आणि व्यवस्थापन पाहण्यासाठी आज जिल्ह्यासह परजिल्ह्यांतूनही शिक्षणप्रेमी नागरिक या शाळेला आवर्जून भेट देतात. संपूर्ण जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २७ स्वतंत्र मुलींच्या शाळा आहेत. त्यात सर्वाधिक पटसंख्या असलेली ही कन्या शाळा गुणवत्तेचे माहेरघर म्हणून ओळखली जाते. उस्मानाबाद जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या २७ शाळा आहेत. त्यात भूम तालुक्यात १, कळंब ४, लोहारा ३, उमरगा १, उस्मानाबाद ७, परंडा २, तुळजापूर ७ व वाशी तालुक्यात

/..पान २



यावर्षी शाळेने लोकवर्गणीतून शाळा परिसर सुशोभीकरणाचे काम हाती घेतले असून त्यातूनच शाळेच्या इमारतीला आकर्षक रंगरंगोटी करण्यात येत आहे. एका वर्गखोलीला हुबेहूब एसटी बससारखा रंग देऊन त्या बसला गुणवत्ता एक्स्प्रेस असे नाव देण्यात आले आहे.

अनेक वाटसरू यावर्ग खोलीला खरोखरीची बस समजून आश्चर्यचकित होतात व रंगरंगोटीबद्दल कौतुक करतात. त्याचप्रमाणे शाळा आणि शाळेच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. सीसीटीव्ही यंत्रणा बसवलेली ही जिल्ह्यातील एकमेव जिल्हा परिषदेची शाळा आहे.

Jalna
Page No. 01 Aug 03, 2017
Powered by: erelego.com

**श्री. महेश धर्माधिकारी सहसचिव, CBSE बोर्ड नवी दिल्ली यांनी ग्राम स्वराज अभियानांतर्गत शाळा भेट करून शाळेचे मूल्यमापन असताना क्षणचित्रे ( दि. ६ आणि ७ ऑगस्ट २०१८ रोजी )**

सकाळ



कसबे तडवळे : येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेला भेट देऊन उपक्रमांची माहिती घेताना महेश धर्माधिकारी.

## कसबे तडवळे कन्या प्रशालेची पथकाकडून पाहणी

कसबे तडवळे, ता. ७ (बातमीदार) : येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळेला मंगळवारी (ता. सात) निती आयोगाच्या मूल्यांकनाची पडताळणी करण्यासाठी मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या केंद्रीय माध्यमिक शिक्षा आयोगाचे सहसचिव महेश धर्माधिकारी यांनी भेट दिली. त्यांनी शाळेच्या विविध उपक्रमांची पाहणी केली.

मनुष्यबळ विकास मंत्रालयाअंतर्गत (दिल्ली) असलेल्या केंद्रीय माध्यमिक शिक्षा आयोगाचे सहसचिव श्री. धर्माधिकारी यांनी मंगळवारी सकाळी शाळेला भेट दिली. सर्वप्रथम शाळेतील गुणवत्ता एक्सप्रेस म्हणून नाव दिलेल्या वर्गखोलीची पाहणी केली. एसटीबसच्या आकारातील या वर्गखोलीची पाहणी केली. त्यानंतर शाळेची रंगरंगोटी, संगणक कक्ष, नावीन्यपूर्ण विज्ञान केंद्र, ई-लर्निंग, वृक्षारोपण, सौरऊर्जा संयंत्र, कराओके म्युझिक सिस्टीम, स्वच्छतागृह आदी भौतिक सुविधांची माहिती घेतली; तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला. शालेय पोषण आहाराबाबतची माहिती घेत विद्यार्थ्यांसोबत मध्यान्ह भोजन घेतले. शहरी भागातील इंग्रजी माध्यमाच्या शाळा देखील तडवळ्यातील कन्या शाळेपुढे फिक्या पडतील, असे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले. त्यांच्यासोबत शिक्षण विस्तार अधिकारी सोमनाथ घोलप, बालाजी यरमुनवाड, शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब वाघमारे, जगन्नाथ धायगुडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भागवत शिंदे, सदस्य प्रताप करंजकर व सर्व शिक्षक उपस्थित होते.

Aurangabad, Osmanabad-Today
08/08/2018 Page No. 3



दहिफळ येथे विद्यार्थ्यांचा सत्कार ▶ फक्त गुणवत्ता असून चालत नाही

# विद्यार्थ्यांनी ध्येय ठरवून वाटचाल करावी : डॉ. कोलते



**वार्ताहर**

**दहिफळ :** कळंब तालुक्यातील जि. प. प्रशाला दहिफळ येथील १० वी, १२ वी मध्ये विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सत्कार जि.प. अध्यक्ष नेताजी पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ संजय कोतले, युवा नेते मल्हार पाटील, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, गटशिक्षण अधीकारी यमुना देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी मुख्याध्यापक शिवाजीराव फाटक, सरपंच शिल्पा पाटील, उपसरपंच बालाजी मते, प्रा. तुषार वाघमारे, तंटा मुक्ती अध्यक्ष बालाजी भातलवंडे, अनिल मते, चरणेश्वर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. ९० टक्केच्या वर गुण मिळवणाऱ्या विद्यार्थीनी अंकिता भातलवंडे, प्राची मांडवकर, प्रणाली धप्पाधुले, विशाखा काकडे, साक्षी मते, प्रीती खंडागळे, निकिता बाराते यांचा सत्कार करण्यात आला. तसेच १२ वीतील एश्वर्या बाराते, आदिनाथ भातलवंडे, संगीता पायाळ यांनी विशेष गुण प्राप्त केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. २०१७-२०१८ मध्ये शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झालेल्या आकांक्षा बाराते, श्वेता किलचे, मोनिका लाटे, साक्षी भातलवंडे, अनुष्का गवळी, गौरी मते, वैष्णव भातलवंडे, आशिष बोरेके, कन्हैया हावळे, तुषार सुतार यांचाही सत्कार करण्यात आला.

डॉ. संजय कोलते म्हणाले कि आज तंत्र ज्ञान खुप विकसित झाले आहे, विद्यार्थ्यांनी प्रथम आपले ध्येय ठरवली पाहिजे. जे ध्येय समोर ठेवले आहे त्या दिशेने जाण्यासाठी जास्त वेळ अभ्यासात घालविला पाहिजे. नुसती गुणवत्ता असून चालत नाही तर ध्येय ठरवावे लागेल. नेमकं आपल्याला काय होयचे आहे. आपल्यात कोणता गुण आहे तो ओळखता आला पाहिजे. ज्यांनी उद्दिष्टे मनासी ठरविले आहे. तोचा आपले ध्येय गाठू शकतो. म्हणून स्वप्न पहा तुम्ही मोठे व्हाल -अभ्यास करा यश मिळेल, असे आहवान केले.

९० टक्केच्या वर गुण मिळवणाऱ्या विद्यार्थिनी अंकिता भातलवंडे, प्राची मांडवकर, प्रणाली धप्पाधुले यांना वैयक्तीक चरणेश्वर पाटील यांनी प्रत्यकी पाच हजार रुपय बक्षीस दिले. हे बक्षीस प्रत्यक्ष वर्षी चालूच राहणार आहे.

फक्त ९० टक्के पेक्षा जास्त गुण घेणारे विद्यार्थ्यांसाठी हे बक्षीस असणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत पडवळ यांनी केले तर आभार माने यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम सर्व शिक्षक बांधवानी घेतले.

---

पुरोगामी विचारांचे एकमत
» उस्मानाबाद, सोमवार दिनांक, २३ जुलै २०१८
epaper http://www.dainikekmat.com
७

# मस्सा (खं) जि.प. प्रशाला खडू मुक्त

▶ ग्रामस्थ व शिक्षकांचे सहभागातून अनेक उपक्रम



**उस्मानाबाद :** मस्सा (खंडेश्वरी) ता. कळंब येथील जिल्हा परिषद प्रशालेत ग्रामस्थ शिक्षक यांच्या सहभागातून विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्यात मोठ्या संख्येने वृक्ष लागवड करण्यात आली. शाळेला 'खडू मुक्त' शाळा असे स्वरूप आले आहे.

सरपंच राजश्री घरणे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अरुण सावंत, मुख्याध्यापक मोहंमद फारुकी यांच्या हस्ते १५ हजार रुपयांच्या रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. लोकवर्गणी व शिक्षकांच्या माध्यमातून ५२ हजार रुपये खर्चून डिजिटल मुख्याध्यापक कक्ष बनविण्यात आला आहे. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानातून खडू मुक्त शाळा करण्यात आली. ग्रामपंचायतीच्या १४ व्या वित्त आयोगातून चार एल.ई.डी. टी.व्ही. बसवून शाळांमध्ये यासह इंटरनेट उपलब्ध करण्यात आले आहे.

शाळेत पोषण आहाराचा दर्जा सुधारला असून दर शुक्रवारी केळी, राजगिरा, लाडू, बिस्कुट, बोट, खमीक यांचा आहार देण्यात येतो. शाळेच्या गुणवत्ते बाबत नुकताच जि.प.च्या उपाध्यक्ष अर्चनाताई पाटील यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी व मुख्याध्यापकांचा सत्कार करण्यात आला. १३ जुलै रोजी शाळा उत्सव अंतर्गत बचत गटांचा महिला मेळावा भरविण्यात आला होता. त्यावेळी १०० महिलांची उपस्थिती विद्यार्थ्यांचा गुणवत्ता बाबत चर्चा करण्यात आली. यावेळी सरपंच राजश्री घरणे यांनी प्रत्यक्ष शाळा जागेची पूर्ण पाहणी करून प्रत्येक वर्गास भेट देऊन समाधान व्यक्त केले. स्वातंत्र्य दिनी गावातील दानशूर व्यक्ती कडून गुणवंत विद्यार्थ्यांना २५ हजार रुपयांचे पारितोषिक दिले जाणार.

## पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा ( इ. ५ वी ) आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा ( इ. ८ वी ) दि. १८ फेब्रुवारी २०१८ मधील यश

- पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा दि.१८ फेब्रुवारी २०१८ रोजी राज्यामध्ये आयोजित केली होती. या परीक्षेच्या राज्य गुणवत्ता यादीमध्ये ११ विद्यार्थ्यांनी स्पृहनीय यश संपादन केले.
- पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा दि.१८ फेब्रुवारी २०१८ रोजी राज्यामध्ये आयोजित केली होती. या परीक्षेच्या राज्य गुणवत्ता यादीमध्ये ७ विद्यार्थ्यांनी स्पृहनीय यश संपादन केले.
- पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा दि.१८ फेब्रुवारी २०१८ रोजी राज्यामध्ये आयोजित केली होती. या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या राज्य गुणवत्ता यादीमध्ये ११ विद्यार्थ्यांनी स्पृहनीय यश संपादन केले.
- पूर्व उच्च प्राथमिक ( इ. ५ वी ) शिष्यवृत्ती परीक्षेच्या जिल्हा स्तरीय गुणवत्ता यादीमध्ये राष्ट्रीय ग्रामीण Set E यासंचातून १०, ग्रामीण Set E यासंचातून १४३ आणि शहरी Set K संचामधून १03 अशाप्रकारे २५६ विद्यार्थ्यांनी स्पृहनीय यश संपादन केले.
- पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती ( इ. ८ वी ) शिष्यवृत्ती परीक्षेच्या जिल्हा स्तरीय गुणवत्ता यादीमध्ये राष्ट्रीय ग्रामीण Set E यासंचातून १०, ग्रामीण Set E यासंचातून ११७, ग्रामीण सर्वसाधारण Set A मधून 3० ग्रामीण अ.जा. Set B मधून ६ आणि ग्रामीण भूमीहीन पालकाचं मूल Set C संचामधून अशाप्रकारे एकूण २५3 विद्यार्थ्यांनी स्पृहनीय यश संपादन केले.
- दि. २४ फेब्रुवारी २०१९ च्या परीक्षेचे आयोजन करण्यासाठी जिलहास्तरावर आणि विद्यार्थ्यांच्या परीक्षेची पूर्वतयारी शाळास्तरावर चालू आहे.

# पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा ( इ. ५ वी ) आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा ( इ. ८ वी ) निकालाचा गोषवारा

| अ. क्र. | परीक्षेचे नाव | परीक्षेचा महिना वर्ष | परीक्षा केंद्रांची संख्या | नोंदविलेल्या शाळांची संख्या | नोंदणी केलेली विद्यार्थी संख्या | परीक्षेस उपस्थित विद्यार्थी संख्या | पात्र / उत्तीर्ण विद्यार्थी संख्या | राज्य गुणवत्ता यादीतील धारक विद्यार्थी संख्या | राज्य गुणवत्ता यादीतील धारक विद्यार्थी संख्या | पात्र / उत्तीर्ण शेकडा निकाल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी ) | फेब्रुवारी २०१७ | 92 | 951 | 14296 | 13894 | 1976 | 256 | 5 | 13.82 % |
| | | फेब्रुवारी २०१८ | 83 | 931 | 13379 | 13031 | 2342 | 256 | 11 | 17.50 % |
| 2 | पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी ) | फेब्रुवारी २०१७ | 71 | 531 | 9739 | 9436 | 786 | 243 | 6 | 8.07 |
| | | फेब्रुवारी २०१८ | 53 | 526 | 8874 | 8635 | 829 | 253 | 7 | 9.34% |

# नीति आयोग अंतर्गत  आकांक्षित जिल्हा  उस्मानाबाद

- शिक्षण विभागाशी संबंधित ८ निर्देशांकांमध्ये उद्दिष्टानुसार साध्य करण्यासाठी केंद्र व राज्य शासनस्तरावर, जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद स्तरापर्यंत १०.५३ कोटी तसेच पंचायत समिती व ग्रामपंचायत मार्फत १४ व्या वित्त आयोगातून निर्देशांकांच्या पुर्तीसाठी प्राधान्यक्रमाने  निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. सदरील निधी अपुरा असून याकरीता शासनस्तरावरून CSR च्या मदतीने प्रयत्न करण्यात येत आहेत.
- मुलींचे शौचालय सुविधा, पिण्याच्या पाण्याची सुविधा, विद्युत सुविधा या निर्देशांकांचे १०० टक्के उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अंमलबजावणी केली जात आहे.
- अशा विविध उपक्रमांच्या आयोजनामुळे मुलींची गळती रोखून शैक्षणिक प्रगती चांगली होण्यास मदत होत आहे.






# जि.प. शाळेस लोकसहभाग तसेच CSR च्या सहकार्याने उपलब्ध करून दिलेल्या सुविधा

**मुलींचे शौचालय कार्यरत सुविधा -जि.प. प्रशाला, सिरसाव ता. परंडा या शाळेस CSR च्या सहकार्याने**



**पिण्याच्या पाण्याच्या सुविधेकरीता RO मशीन कार्यरत सुविधा - जि.प.प्रा.शा. कदमवाडी (आ.) ता. तुळजापूर या शाळेस लोकसहभागातून**



# मुलींचे शौचालय  कार्यरत सुविधा







**IT OSMANABAD**
@Itosmanabad

अध्ययन स्तर निश्चिती
ओजस – आंतरराष्ट्रीय शाळा शिराढोण




4:01 pm · 21 Aug 18

View Tweet activity

# भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय ओजस शाळा, शिराढोण,

## ता. कळंब, जि. उस्मानाबाद लोकार्पण कार्यक्रम दि.२५ डिसेंबर २०१८ या शाळेस

**महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या मान्यतेने या शाळेचा प्रारंभ दि. १५ जून २०१८ पासून करण्यात आला.**



अर्चनाताई पाटील : गुणवत्तावाढीसाठी शिक्षकांनी प्रयत्न करावेत, शिराढोणच्या शाळेचे नामकरण

## 'ओजस' आता भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा

दरवर्षी नवीन वर्गाचा समावेश

सर्व वर्गांत एलसीडी बसवा

इमारतीचे काम लवकरच सुरु करु



दिव्य मराठी

उस्मानाबाद जिल्हा

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा • भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा असे नामकरण करण्यात आले

- राज्यातील १३ शाळांसोबत शिराढोणच्या शाळेलाही मिळाला मान
- ऑनलाइन लोकार्पणासाठी प्रशासनाच्या वतीने चोख व्यवस्था

## शिराढोण येथील ओजस आंतरराष्ट्रीय शाळेचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ऑनलाइन लोकार्पण

जिल्हा परिषदेच्या पदाधिकारी, अधिकाऱ्यांचीही उपस्थिती, ऑनलाइन लोकार्पणामुळे ग्रामस्थांमध्ये होते औत्सुक्य

प्रशासनाची जोरदार तयारी

**जिल्हा परिषदेमार्फत पहिले बालकुमार साहित्य संमेलनाचे आयोजन जिल्हास्तरावर दि.२१ डिसेंबर २०१८ रोजी जि.प. कन्या प्रशालेच्या प्रांगणामध्ये आयोजित करण्यात आले. या संमेलनास ७००० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून मराठी भाषेच्या साहित्याबाबतची माहिती घेण्यात आली.**



तातडीने चौकशी करा 》3 जेवळीत

उस्मानाबाद : जिल्हा परिषदेच्या पहिल्या बालकुमार साहित्य संमेलनानिमित्त काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीत संतांच्या वेशभूषेत सहभागी विद्यार्थी. (दुसऱ्या छायाचित्रात) टाळ-मृदंगाचा गजर करीत वारकऱ्यांच्या वेशभूषेत सहभागी झालेले विद्यार्थी. (तिसऱ्या छायाचित्रात) फलक हाती घेतलेले विद्यार्थी. (चौथ्या छायाचित्रात) ग्रंथदिंडीत सहभागी विद्यार्थिनी. (छायाचित्रे : राहुल कोरे, आळणीकर)

## मुलांना व्यक्त होण्याची संधी

### प्रा. भास्कर चंदनशिव, बालकुमार साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन

सकाळ वृत्तसेवा

उस्मानाबाद, ता. २२ : साहित्य हा माणसाला माणसात आणणारा व्यवहार आहे. आई ही पहिली बालसाहित्यिक आहे. ती मुलांच्या रडण्या, बागडण्यापासून ते अंगाई गीतांपर्यंत साहित्य निर्माण करते. मुलांना व्यक्त होण्याची संधी अशा बालकुमार साहित्य संमेलनापुळे मिळत आहे, असे मत साहित्यिक प्रा. भास्कर चंदनशिव यांनी व्यक्त केले.

जिल्हा परिषदेच्या वतीने शहरातील कन्या प्रशालेच्या प्रांगणात आयोजित बालकुमार साहित्य संमेलनात ते बोलत होते. उद्‌घाटन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते झाले. श्री. चंदनशिव यांच्यासह जिल्हा परिषदेचे अध्यक्ष नेताजी पाटील, उपाध्यक्षा तथा संमेलनाच्या स्वागताध्यक्षा अर्चनाताई पाटील, संमेलनाध्यक्ष साक्षी तिगाडे, साहित्यिक बालाजी इंगळे, माधव गरड, राजेंद्र अत्रे, पंचायत समितीचे सभापती बालाजी गावडे यांच्यासह जिल्हा परिषद सदस्यांची उपस्थिती होती.

या वेळी बोलताना आमदार पाटील म्हणाले, की साहित्याने माणूस समृद्ध होतो. बालवयामध्ये साहित्याचा प्रभाव पडणे गरजेचे असते. साहित्यामुळे मुलांचे भावविश्व बदलून जाण्यास मदत होईल. विचार प्रगल्भ बनण्यासाठी साहित्याचा सर्वात मोठा फायदा होतो. मुलांना व्यक्त होण्यासाठी साहित्य संमेलनासारखे व्यासपीठ उपलब्ध करून दिले पाहिजे. या संमेलनाच्या

पान ३ वर »

उस्मानाबाद : बालकुमार साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी आमदार राणाजगजितसिंह पाटील, नेताजी पाटील, अर्चनाताई पाटील, भास्कर चंदनशिव, माधव गरड, राजेंद्र अत्रे, कमलताई नलावडे, रोहिणी कुंभार आदी. (छायाचित्र : राहुल कोरे)

### लेखणीमुळे मिळाला मान

संमेलनाध्यक्षपदाचा मान मला लेखणीमुळे मिळाला असून, यापुढेही अधिक चांगले लेखन करण्याचा प्रयत्न करणार असल्याची भावना साक्षी तिगाडे हिने व्यक्त केली. साक्षीने या वेळी तिच्या कवितांचे वाचन केले. उपस्थित विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद देत उत्स्फूर्त दाद दिली.

### बालसाहित्यिकांची लक्षवेधक ग्रंथदिंडी

उस्मानाबाद, ता. २२ : जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित पहिल्या बालकुमार साहित्य संमेलनाची सुरवात ग्रंथदिंडीने करण्यात आली. या ग्रंथदिंडीत विविध शाळांचे विद्यार्थी आकर्षक वेशभूषेत सहभागी झाले होते.

शहरातील प्रमुख मार्गावरून निघालेली ही ग्रंथदिंडी लक्षवेधक ठरली. शनिवारी (ता. २२) सकाळी साडेआठच्या सुमारास जिल्हा परिषद कन्या प्रशालेपासून ग्रंथदिंडीचा प्रारंभ जिल्हा परिषदेचे अध्यक्ष नेताजी पाटील, उपाध्यक्ष तथा संमेलनाच्या स्वागताध्यक्षा अर्चना पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. ही ग्रंथदिंडी टपाल कार्यालय, काळा मारुती मंदिर, ताजमहाल टॉकीज, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळामार्गे जिल्हा परिषद कन्या प्रशालेत संमेलनस्थळापर्यंत काढण्यात आली. या ग्रंथदिंडीत महापुरुषांच्या वेशभूषेत विविध शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. टाळ, मृदंगाचा गजर करणारे पथक, विविध वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी उस्मानाबादकरांचे लक्ष वेधून घेतले. या दिंडीत विविध जनजागृतीपर घोषणा देत सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला. ग्रंथदिंडीत संत परंपरा, उस्मानाबाद जिल्हा दर्शन, एकता बल, स्वच्छता मिशन, पर्यावरण संवर्धन, ग्रामीण संस्कृती आदी चित्ररथाचे सादरीकरण करण्यात आले होते.



आज ग्रंथदिंडीने प्रारंभ : विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी मिळाली मेजवाणी

## बालकुमार साहित्य संमेलनाची घंटा वाजली

ग्रंथदिंडी, परिसंवाद अन् सांस्कृतिक कार्यक्रम

## व्यवसाय मार्गदर्शन शिबीर अंतर्गत व्यवसायिक अभ्यासक्रमांतर्गत मोबाईल व्हॅन द्वारे जि.प. प्रशालेतील विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थ्यांच्या व्यवसायिक कौशल्यांचा विकास करण्यासाठी मसर्गदर्शन करण्यात आले.









# प्राथमिक शिक्षकांचे समायोजन

**या प्रक्रियेची अंमलबजावणी प्रथम तालुकास्तरावर आणि त्यानंतर जिल्हास्तरावर करण्यात आली.**

दि. 31/12/2018 - दै. सकाळ

## अतिरिक्त शिक्षकांची समायोजनातून नियुक्ती

उमरगा, ता. ३० (बातमीदार) : तालुक्यातील अतिरिक्त ठरलेल्या २१ प्राथमिक शिक्षकांपैकी २० जणांची रिक्त जागांवर समायोजन पद्धतीने नियुक्ती करण्यात आली.

शिक्षकांची तालुकाअंतर्गत समायोजन प्रक्रिया शनिवारी (ता.२९) गटशिक्षण कार्यालयात निरीक्षक तथा जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बी. एच. निपाणीकर व विस्तार अधिकारी सोमनाथ घोलप यांच्यासह गटविकास अधिकारी भारत जगताप, गटशिक्षणाधिकारी देविदास बनसोडे, विस्तार अधिकारी शिवकुमार बिराजदार यांच्या उपस्थितीत झाली. शाळेतील पटसंख्या कमी झाल्याने ३० सप्टेंबर २०१८ च्या संच मान्यतेनुसार शासन निर्णयाप्रमाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संजय कोलते यांच्या आदेशानुसार शनिवारी अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांच्या समायोजनाची प्रक्रिया झाली. तालुक्यात एकूण २१ प्राथमिक शिक्षक पटसंख्येअभावी अतिरिक्त ठरविण्यात आले होते. त्यापैकी २० शिक्षकांना रिक्त असलेल्या शाळांतील जागेत स्थान मिळाले आहे. समायोजन प्रक्रिया पारदर्शक होण्यासाठी प्रोजेक्टरपद्धतीने पद नेमणुकीचे काम करण्यात आले आहे. जागेअभावी नऊ शिक्षकांना आता जिल्हास्तरावर होणाऱ्या समायोजन प्रक्रियेतून नियुक्ती घ्यावी लागणार आहे. दरम्यान अतिरिक्त ठरलेल्या एका मुख्याध्यापकाचे कोथळी येथील शाळेत समायोजन करण्यात आले आहे.

### नऊ शिक्षकांना जिल्हाअंतर्गत स्थान

तालुक्यात प्राथमिक शिक्षकांच्या जागा रिक्त नसल्याने अतिरिक्त ठरलेल्या नऊ शिक्षकांना आता जिल्हास्तरावर होणाऱ्या समायोजन प्रक्रियेत सहभाग घ्यावा लागणार आहे. त्यांची अन्य तालुक्यांतील रिक्त जागावर नियुक्ती केली जाऊ शकते. दरम्यान अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांच्या समायोजनाची प्रक्रिया १५ डिसेंबरला जिल्हास्तरावर होती, मात्र १४ डिसेंबरपर्यंत समायोजन प्रक्रियेसंदर्भात हरकतींची संख्या अधिक असल्याने आणि प्रक्रिया सुरळीत होण्याची शक्यता नसल्याने ही प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. त्यानंतर जिल्हा प्रशासनाने तालुकास्तरावरच ही प्रक्रिया घेण्याचे सूचित केले होते.

## तीन-चार वर्षांत पहिल्यांदाच परंड्यात शिक्षक 'फुलफिल'

### जिल्हास्तरीय समायोजन : ४३ गुरुजींना सोयीच्या शाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

उस्मानाबाद : दर वर्षी अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाची प्रक्रिया पार पडते. परंतु, 'परंडा तालुका नको रे बाबा' असे म्हणत प्रत्येकवेळी गुरुजी परंड्यातील शाळा टाळत असत. परंतु, यंदा अध्यक्ष आणि 'सीईओं'नी यासंदर्भात लक्ष घातल्यानंतर तीन-चार वर्षांत पहिल्यांदाच हा तालुका शिक्षकांच्या बाबतीत 'फुलफिल' झाला आहे. सोमवारी झालेल्या समायोजन प्रक्रियेतून ४३ जणांना सोयीच्या शाळा मिळाल्या आहेत.

जिल्हा परिषदअंतर्गत कार्यरत अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनासाठी काही दिवसांपूर्वीच तालुकास्तरावर प्रक्रिया राबविण्यात आली. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी प्रक्रिया झाल्यानंतरही जवळपास ४३ शिक्षक अतिरिक्त ठरले होते. साधारणपणे दहा-पंधरा दिवसांपूर्वी जिल्हास्तरीय समायोजन प्रक्रिया ठेवण्यात आली होती. परंतु, प्रक्रियेच्या अनुषंगाने काही शिक्षकांनी आक्षेप घेतल्यानंतर ही प्रक्रिया पुढे ढकलली होती. दरम्यान, आक्षेपांच्या अनुषंगाने गुरूजींचे समाधान झाल्यानंतर सोमवारी पुन्हा समायोजन प्रक्रिया राबविण्यात आली. सदरील प्रक्रियेतून मराठी माध्यमाचे ३९ आणि उर्दू माध्यमाचे ४ अशा ४३ शिक्षकांचे समायोजन करण्यात आले. दरम्यान, कुठल्याही परिस्थितीत परंडा तालुक्यातील शिक्षकांच्या जागा रिक्त राहू नयेत, अशा सूचना जि.प. अध्यक्ष नेताजी पाटील, 'सीईओ' डॉ. संजय कोलते यांनी केल्या होत्या. त्यानुसार सर्व रिक्त जागा भरल्या गेल्या.

**२५ ते ३० जागा राहात होत्या रिक्त...**

- परंडा तालुका जिल्ह्याच्या एका टोकाला आहे. त्यामुळे समायोजनावेळी बहुतांश शिक्षक उस्मानाबाद, तुळजापूर, वाशी, कळंब अशा तालुक्यांना प्राधान्य देत. त्यामुळे प्रत्येक वर्षी परंडा तालुक्यात शिक्षकांच्या किमान २५ ते ३० जागा रिक्त राहात होत्या. जिल्हा परिषद सदस्य दत्ता साळुंके याबाबत सभागृहात सातत्याने आवाज उठवित असत. सदरील पाठपुराव्याची दखल घेत अध्यक्ष व सीईओंनी संबंधित विभाग प्रमुखांना सूचना केल्यानंतर अखेर रिक्त सर्व जागा भरल्या गेल्या.

# उमेद स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, जि.प. उस्मानाबाद

( पदवीधर व पदवीच्या अंतीम वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या मुलींना प्रवेश )

- उस्मानाबाद जिल्हा हा दुष्काळी आणि आत्महत्त्या ग्रस्त शेतकऱ्यांचा जिल्हा म्हणून ओळखला जात आहे. या भागातील शेतकरी, शेतमजूर तसेच कर्मचारी यांच्या मुलींना स्पर्धा परीक्षेकरीता पोषक व गुणवत्तापूर्ण वातावरण निर्माण करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करून त्यांच्यामध्ये उमेद निर्माण करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाची अंमलबजावणी दि. १ मे २०१६ पासून आजपर्यंत चालू आहे.
- या स्पर्धा परीक्षा केंद्रामध्ये दरवर्षी १ मे आणि १ नोव्हेंबर रोजी नवीन बॅचची सुरूवात केली जाते. अद्यापपर्यंत ५ बॅचेस मधून ५०० मुलींची नोंदणी करून विनामुल्य प्रवेश देण्यात आला असून त्यापैकी दररोज ८० मुली नियमीतपणे उपस्थित राहून या केंद्राचा लाभ घेत आहेत. या केंद्रास लागणाऱ्या भैतिक सुविधा व व्याख्याते यांच्यासाठी होणारा खर्च जि.प.कर्मचारी कल्याण निधीमधून करण्यात येत आहे.
- या स्पर्धा परीक्षा केंद्राचा नियमितपणे लाभ घेऊन अद्यापपर्यंत २२ मुलींनी ( MPSC मार्फत ९ आणि इतर विभागामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये 93 मुली ) कठीण परिश्रम करून उज्वल यश संपादन करून त्यांनी स्वत:मध्ये आत्मविश्वास निर्माण केला आहे. उर्वरित सर्व होतकरू व हुशार मुलींमध्ये त्यांनी उमेद निर्माण केली आहे.

# उमेद स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामध्ये UPSC व MPSC मध्ये उज्वल यश संपादन

## केलेल्या मुलींचा सत्कार करून त्यांचे प्रेरणादायी मार्गदर्शनाचा लाभ देण्यात आला.






**उमेद स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामध्ये व कार्यकारी समितीच्या बैठकीच्यावेळी यशवंत मुलींचा सत्कार प्रसंगी**





# मुलींसाठी स्पर्धा परीक्षा व व्यवसाय मार्गदर्शन शिबीराचे आयोजन प्रसंगी मार्गदर्शन करत असताना

(इ.१० वी व १२ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी )











Thank
You